माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११८६/२२/त.क्र.११६/२५/०१**

**श्री.आत्माराम उत्तमराव कावरे**

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक **(कार्मिक)**
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.
कृषी उद्योग भवन, ३ रा मजला, दिनकरराव देसाई मार्ग,
आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पू.), मुंबई-४०० ०६५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक **(प्रशासन)**
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.
कृषी उद्योग भवन, ३ रा मजला, दिनकरराव देसाई मार्ग,
आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पू.), मुंबई-४०० ०६५.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १८.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि.१८.११.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्री.आत्माराम कावरे यांनी अपिल क्र.६५६/२२, दि.१७.०५.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदवित कलम १८ अन्वये प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केला आह.

वरील आदेशाचे अवलोकन केले असता, तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी ६० दिवसानंतर अपिलार्थीना त्यांच्या ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील पुरविण्याचे निर्देश झाले आहेत.

आज झालेल्या सुनावणीत महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या. यांच्या वतीने ॲड.भूषण जोशी उपस्थित असून अपिलार्थीनी या संदर्भात त्यांच्या ६ व्या वेतन आयोगापोटीच्या थकबाकीसंदर्भात राज्य माहिती आयोग तसेच मा.लोकायुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व थकबाकी दिली असून अपिलार्थींना ती प्राप्त देखिल झाली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज हा कालबाह्य तसेच तथ्यहिन असून निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Maharashtra *

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.११.२०२५**

jyotsna